# राजाराम माने, प्रशासकीय सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुणे खंडपीठ पुणे यांचेसमोरील कामकाज.

---------

Rev. Appli. No. NS/V/१/२०१४

| | | |
|---|---|---|
| **१) जगन्नाथ बाळा दळवी (म.वा.)** | ) | अर्जदार |
| श्री. सुभाष जगन्नाथ दळवी | ) | |
| श्री. विजय जगन्नाथ दळवी | ) | |
| दोघे रा. विलास डिस्कळ, ता. खटाव, जिल्हा सातारा | ) | |
| विरुध्द | | |
| १) महाराष्ट्र शासनातर्फे, उपविभागीय अधिकारी फलटण, | ) | जाब देणार |
| उपविभाग फलटण, जिल्हा सातारा. | ) | |
| २) तहसिलदार खटाव, जिल्हा सातारा | ) | |
| ३) श्री. ज्योर्तिलिंग देव डिस्कळ, ता. खटाव, जि. सातारा | ) | |
| ४) श्री. कंठनाथ देव डिस्कळ, ता. खटाव, जि. सातारा | ) | |
| ५) श्री. श्रीधर दामू गुरव, | ) | |
| रा. विलास डिस्कळ, ता. खटाव, जिल्हा सातारा | ) | |

## न्यायनिर्णय

फेरचौकशी अर्जदार यांनी सदरचा पुनर्निरीक्षण अर्ज उपविभागीय अधिकारी फलटण यांचेकडील क्रमांक वतन/फेरचौकशी/८८/२०११ निर्णय दिनांक १८/६/२०१२ वर नाराज होऊन दाखल केलेले आहे. उपविभागीय अधिकारी फलटण यांचेकडे दाखल अपील अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण खटाव यांचेकडील क्रमांक ३२ग-डिस्कळ ५९ए निर्णय दिनांक ४/१०/१९७७ विरुध्द दाखल केलेले आहे. प्रकरणाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे आहे.

खालील कोर्टाची कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, तहसिलदार खटाव यांनी दिनांक ३१/३/२०२१ रोजी वाद जमिनी देवस्थान वर्ग ३ असुन त्याचा शर्तभंग झालेला आहे त्यामुळे त्या संदर्भातील सदर प्रकरण पुर्नविलोकनात घेऊन रद्द करणेबाबत अहवाल दिलेला आहे. तहसिलदार यांनी अहवाल पाठविताना गट नंबर ४१०, ४९२ व ४९३ जमीनमालक श्रीधर दामू गुरव व खरेदी घेणार जगन्नाथ बाळा दळवी असे नमूद केलेले आहे. उपविभागीय अधिकारी यांनी सदरचा आदेश फेरचौकशी करुन जमीन स.नं. २७९ क्षेत्र २२

झाला असुन, आर देवस्थान जमीन असुन देवस्थान जमिनीचा न्यास (Trust) देवस्थानला कुळकायदा कलम ८८ब चे प्रमाणपत्र दिले आहे म्हणून तहसिलदार यांनी टेनन्सी केस ३२ग हिस्कळ ३१० चा संदर्भ देऊन जगन्नाथ बाळा दळवी यांचा कुळ हक्क रद्द केलेला असुन झालेला ३२ग चुकीचा आहे म्हणून ते आदेश रद्द करुन क्षेत्र देवस्थानचे नावे पूर्ववत ठेवण्याबाबत आदेश केलेला आहे. या न्यायाधिकरणाकडे केलेल्या फेरचौकशी अर्जामध्ये अर्जदार यांनी सादर केलेले कागदपत्रांचे फेरीस्तमधील पान ७ वर सहाय्यक धर्मादाय आयुक्त कोल्हापूर यांचे पत्र सादर केलेले असुन त्यामध्ये वाद जमिनी स.नं. २७९ हिस्सा क्रमांक १ व ३ (स्पष्ट दिसून येत नाही) देवस्थान न्यासाच्या मिळकती नसून स.नं. २७९ चा हिस्सा नं. २ व २८३ या देवस्थान जमिनी आहेत असे नमूद केलेले आहे. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचे आदेशामध्ये स.नं. २७९ चा उल्लेख केलेला असुन तहसिलदार यांचे आदेश रद्द केलेले आहेत. त्यामध्ये २७८/१, २, ३ असे नमूद केलेले आहे. सदर प्रकरणी ताळमेळ घेणे गरजेचे आहे.

फेरचौकशी अर्जाची प्रथम सुनावणी दिनांक २१/६/२०१७ रोजी सुरु झालेली असुन कोरोनाचा कालावधी संपल्यानंतर सुध्दा दिनांक २५/११/२०२१, ३/२/२०२२ व १०/३/२०२२ रोजी दोन्ही पक्षकार गैरहजर राहिलेले आहेत. त्यामुळे गुणवत्ते आधारीत निर्णय देण्याचे ठरविण्यात आले.

वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे पत्रातील देवस्थान न्यासाचा नसलेल्या उल्लेखाबाबत इनामपत्रकामध्ये तपासणी करुन वाद जमिनीबाबत निर्णय घेणे योग्य ठरेल या निष्कर्षाप्रत येऊन पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) पुनर्निरीक्षण अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) निकालपत्रात उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत खालील कोर्टाने फेरचौकशी करुन योग्य ते कायदेशीर निर्णय मुदतीत घ्यावेत यासाठी प्रकरण त्यांचेकडे परत (रिमांड) करण्यात येत आहे.

NS/V/१/२०१४

३) सदर निकालाची समज उभय पक्षकारांना देण्यात यावी.

४) खालील कोर्टाचे अभिलेख संबंधितांना परत करण्यात यावेत.

कौन्सिल हॉल, पुणे १
दिनांक : ०१/०४/२०२२

( राजाराम माने )
प्रशासकीय सदस्य
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण,**
**खंडपीठ पुणे.**